## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन लक्षवेधी

### महाराष्ट्र विधानमंडळ नियम १०५ अन्वये सूचना क्र. ८७४

**मा.श्री.चेतन तुपे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे :-**

"राज्यातील लोककलावंत, तमाशाकलावंत यांच्यासाठी शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने सुमारे दीड वर्षापूर्वी जाहीर केलेल्या पॅकेजनुसार अनुदानाच्या रकमा कलावंताना अद्यापही अदा न करण्यात आल्यामुळे दिनांक ११ जानेवारी, २०२३ अथवा त्या सुमारास पासून राज्यभरातील कलावंतानी मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसण्याचा दिलेला इशारा, अनुदानाच्या रकमा अदा करणे तसचे इतर महत्त्वाच्या मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्यामुळे कलावंतामध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, कोरोना काळात कला सादरीकरणाचे काम पूर्णत: बंद पडल्यामुळे आणि उपजीविकेचे साधन नसल्यामुळे अनेक कलावंतांच्या वाटेला आलेले कर्जबाजारीपण, संबंधित निर्णयांच्या अंमलबजावणीत होत असलेल्या दिरंगाईमुळे कलावंतांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, शासनाचे ह्या बाबीकडे दुर्लक्ष, सदरबाबत तातडीने कार्यवाही होण्याची आवश्यकता इ."

****************************************

### मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे निवेदन

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रयोगात्मक कला प्रकारातील कलाकार व कलासमुह यांना अर्थसहाय्य अनुदान तसेच स्थानिक प्रयोगात्मक कलेतील कलाकारांच्या व संस्थांच्या निवडीशी संबंधित प्रशासकीय खर्चास दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य करण्याबाबतच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी व शर्तीमध्ये शिथिलता तसेच अंमलबजावणीची कालमर्यादा दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत वाढविण्यास दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता देण्यात आली होती.

तसेच राज्यातील ७३३५ वैयक्तिक लाभार्थी व प्रयोगात्मक कलाप्रकारातील १०५ कला समुह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, ३२० कला समूह व संस्थांना दिनांक २८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये व १०८ कला समूह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

****************************************